# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी 'शिवाजी सावंत : व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावरील प्रबंध सादर करताना मला आनंद हात आहे. या संशोधनामध्ये परिपूर्णता येण्यासाठी अनेक व्यक्ती आणि संस्था यांचे मौलिक मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. या सर्वांचा ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो. हा प्रबंध पूर्णावस्थेत येण्याचे सर्व श्रेय आरदणीय गुरूवर्य प्राचार्य डॉ. जयंत कळके यांचे आहे. प्रबंध विषयाच्या मार्गदर्शनाबरोबर मांडणीतील शिस्त आणि नेमके चिकित्सक, गंभीर वाङ्मयीन भूमिका माझ्यामध्ये निर्माण करण्याचे प्रयत्न कळके सरांनी केले. त्यामुळे वाङ्मयाकडे बघण्याचा माझा दृष्टिकोन बदलून गेला. कळके सरांचा मौलिक मार्गदर्शनाचा संबंध केवळ प्रबंधापुरता न राहता तो कौटुंबिक क्षेत्रापर्यंतही झाला. कळके सरांचे ऋण आणि प्रा.सौ. माधवी कळके यांच्या कुटुंबीयांचे आशीर्वाद ही माझ्या आयुष्यातील मिळकत आहे. त्यांच्या ऋणात राहणे मला इष्ट वाटते.

अशिक्षित असूनही जीवनातील संस्काराचे पहिले धडे गिरवायला ज्यांनी शिकवले ते माझे आई-वडील आक्काताई महादेव होडगे सगळ्या प्रतिकूल परिस्थितीत मला पदव्युत्तर शिक्षणापर्यंत मदत करणारे चुलते श्री चाळू होडगे (आबा) या बरोबरच मी लहानपणापासून आई समान मानलेल्या माझ्या आत्या बाय्याक्काआई ज्येष्ठ बंधु नंदकुमार होडगे, लहान बंधु नारायण होडगे, बहिण सौ. मंगल शंकर खोराटे यांचे आशीर्वादही लाख मोलाचे आहेत.

जिनं प्रिय कन्या स्वयंप्रभा व चि. शिवम् यांना संस्कारशील घडविले, जी माझ्यासाठी पहिली सावली नि दुसरा श्वासच आहे ती पत्नी सौभाग्यवती गीता हिने कौटुंबिक सर्व जबाबदारी सांभाळून कष्टाने आपले शिक्षण पूर्ण केले आणि मला लेखनाच्या कामात निवांतपणा दिल्यामुळेच मी माझे संशोधनाचे काम पूर्ण करू शकलो.

आमच्या संस्थेचे संस्थापक खासदार सदाशिवराव मंडलिकसाहेबांचे आशीर्वाद तर दिल्ली येथील यु.जी.सी. चे अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात, माजी अध्यक्ष डॉ. अरूण निगवेकर, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, बी.सी.यु.डी. चे संचालक डॉ. ए.ए. डांगे, आमच्या संस्थेचे अध्यक्ष गजाननराव गंगापूरे महालक्ष्मी दूध संघाचे अध्यक्ष आणि आमच्या संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. संजय मंडलिक, मार्गदर्शक डॉ. जयंत कळके, कार्यवाह टी.एस. गायकवाड या सर्वांच्या आशीर्वादाने आणि सहकार्याने विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्यावतीने

पीएच.डी. संशोधनासाठी मला तीन वर्षाची अभ्यासगत रजा (टिचर फेलोशिप) मिळाली. या सर्वांचा उल्लेख करणे मला महत्त्वाचे वाटते.

संशोधन कार्यात महत्त्वाचा उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे लेखक शिवाजी सावंत यांच्या पत्नी श्रीमती मृणालिनी सावंत, अमिताभ सावंत, सध्या अमेरिकेत वास्तव्य असणारी कादंबिनी पराग धारप, विश्वासराव सावंत, ज्योतिप्रसाद सावंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे येथील अनिरूद्ध कुलकर्णी, जयराम देसाई, अशोक गगराणी, महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी प्रा. कविता गगराणी-पाटील, पत्रकार समीर देशपांडे, सागर देशपांडे, श्रीराम पच्छिंद्रे यांनी शिवाजी सावंत यांचे सर्व प्रकाशित, अप्रकाशित, हस्तलिखित साहित्य मला संशोधनासाठी देऊन मदत केली. त्यामुळेच माझे काम सुकर झाले. या सर्वांचे ऋण शब्दातीत आहेत.

संशोधनाची प्रथम वाट ज्यांनी मला अनेक अडचणी असतानासुद्धा चालावयाला शिकविली, संशोधनास प्रेरणा आणि प्रोत्साहन दिले ते माझे एम्.फिल्.चे मार्गदर्शक आणि शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख गुरूवर्य डॉ. विश्वनाथ शिंदे, सौ. उज्ज्वला शिंदे यांच्याही ऋणात राहणे मला इष्ट वाटते. गुरूवर्य डॉ. गो.मा. पवार, डॉ. ल.रा. नसिराबादकर, मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. चंद्रशेखर जहागिरदार, डॉ. राजन गवस, प्रा. भैरव कुंभार, प्रा. विठ्ठल बन्ने, डॉ. शिवशंकर उपासे, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. विजय निंबाळकर, डॉ. अच्युत माने, प्रा. चंद्रकुमार नलगे, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. हिमांशू स्मार्त, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. डी.ए. देसाई, कला विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. जे.आर. जाधव, वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. व्ही.एस. पाटील, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. पी.ए. कोळी, डॉ. जे.एन. शिंदे, डॉ. अनिल गवळी, डॉ. शिवाजी पाटील, डॉ. शिवकुमार सोनाळकर, डॉ. राजेखान शाणेदिवाण, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे, डॉ. डी.व्ही. तोगले, ॲड.सुरेश कुराडे, सूर्यकांत पाटील (बुद्धिहाळकर), प्रा.सुधीर जोशी, प्राचार्य टी.एस. पाटील, प्राचार्य डॉ. हिंदुराव पाटील, डॉ. प्रकाश कुंभार, प्रा. विष्णू वासमकर, डॉ. जी.पी. माळी, डॉ. दिपक चव्हाण, डॉ. शशिकांत चौधरी, डॉ. धम्मपाल रत्नाकर, डॉ. रफिक सूरज मुल्ला डॉ. महेंद्र कदम, डॉ. गिरीश मोरे, डॉ. सुलक्षणा कुलकर्णी, प्रा. एकनाथ पाटील, प्रा. तानाजीराव पाटील यांचेही प्रेरणा व सहकार्य मिळाले.

माझे टिचर फेलो मित्र डॉ.जालंधर पाटील, डॉ. अनिल उबाळे, प्रा. दत्ता पाटील, प्रा गोपाळ गावडे, डॉ. बाबा नाईक, डॉ. मनमोहन राजे, प्रा. महावीर कांबळे

तसेच अनेक अडचणी असतानासुद्धा मला सहकार्य करणारा विद्यार्थी मित्र प्रा. सुखदेव एकल, प्रा. नंदकुमार मोरे, प्रा. आप्पा जाधव, दत्तात्रय देशपांडे (पत्रकार), प्रा. दत्ता किंकर, माझे नातेवाईक प्राचार्य राजेंद्र रामचंद्र खोराटे, माझे मेहुणे श्री. संतोष एकनाथ वारके, प्रा. अनिल उंदरे, प्राचार्य निरंजन खिचडी, प्राचार्य डी.के. गोटुरी, प्राचार्य विलास पाटील, प्राचार्य सुनीलकुमार लवटे, मुख्याध्यापक हिंदुराव नौकुडकर, प्रा. संजय पाटील, प्रा. वांद्रेसर, श्री. डी.एस. पाटील (सी.ए), श्री. विनय पाटील, श्री. सतिश कुसुंबे, संशोधक विद्यार्थी प्रा. सविता घाटगे, प्रा. प्रदिप कांबळे, मारूती तुपेरे, गजानन अपिने, रामदास नाईकनवरे, संभाजी शिंदे, सर्जेराव कांबळे यांच्याशी वेळोवेळी केलेली चर्चा मला मोलाची वाटते.

पीएच.डी. संशोधन काळात (दिनांक २८ एप्रिल, २००७) साहित्य, कला विकास प्रतिष्ठान, सातारा यांच्यावतीने 'डॉ. शिवाजीराव चव्हाण, संशोधन पुरस्कार' मला प्राप्त झाला त्याबद्दल या संस्थेचे सर्व पदाधिकारी व पाचार्य डॉ. यशवंत पाटणे यांचे ऋणनिर्देश करणे माझे कर्तव्य आहे. जयशिवराय एज्युकेशन सोसायटी, मुरगूड सर्व शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अर्जून कुंभार, ग्रंथपाल प्रा. टी.एच. सातपुते, ग्रंथपाल बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, ग्रंथपाल गंगामाई वाचनालय आजरा, ग्रंथपाल करवीर वाचन-मंदिर कोल्हापूर, ग्रंथपाल रणजित देसाई सार्वजनिक वाचनालय कोवाड तसेच माझे सहकारी मित्र प्रा. एम.ए. कोळी, प्रा. उदय शिंदे, प्रा. दत्ता चौगले, शिवाजी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य श्री. पी.बी. आंगज, प्रा. डी.पी. साळुंखे, प्रा. अद्वैत जोशी, प्रा. टी.एम. पाटील, प्रा. शिवाजी पोवार, प्रा.सौ. एम.एस. पाटील, प्रा.सौ. सुमन शिरगावे, प्रा. पी.एस. सारंग, प्रा. माधव बेनके, प्रा. एच.एम. नदाफ, प्रा. आनंद पाटील, प्रा. आर.बी. पाटील, प्रा. के.एस. पवार, डॉ. ए.जी. मगदूम, अधीक्षक श्री. दिलिप कांबळे, प्रा. सुरेश दिवाण, श्री. एच.के. सोनाळकर, श्री. सुखदेव चौगले श्री. महादेव भोई यांचेही आभार.

प्रबंध अत्यंत निर्दोष व सुबक होण्यासाठी डी.टी.पी. करणारे आमचे मित्र श्री. विष्णू खाडे, सौ. सुनीता खाडे यांचे ऋण व्यक्त करण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणे मला महत्त्वाचे वाटते. लेखन शुद्धतेसाठी मदत करणारे विद्यार्थी मित्र प्रा. सुखदेव एकल यांचेही सहकार्य शब्दातीत आहे.

**– श्री. शिवाजी महादेव होडगे**

-----